# Shreenath Mhaskoba Sakhar Karkhana Ltd.

**Shreenathnagar Patethan, Post-Rahu, Tal. Daund, Dist. Pune-412 207** EPABX : 9923002924 / 8551858899


SMSKL/Admin/631 /2021-22

Dt.15/06/2021

Shreenath Mhaskoba Sakhar Karkhana Ltd.

## CSR Expenses Details.

| Sr.No. | Name of Head | Amount Rs. | | | | | | | Total Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2014-15 | 2015-16 | 2016-17 | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | |
| 1 | Gopalan & Farming | 356499 | 50246 | 346606 | 435200 | 175610 | 225369 | 94456 | **1683986** |
| 2 | Recreation Hall for nearby farmers and Schools for their children | 181000 | 683072 | 160014 | 227000 | 2351452 | 656278 | 1060633 | **5319449** |
| 3 | Farmers Training Programs | 60603 | 101451 | 116073 | 352870 | 73524 | 165046 | 20223 | **889790** |
| 4 | Ganesh Festival | 22644 | 70657 | 48834 | 78569 | 92936 | 66819 | 5995 | **386454** |
| 5 | Sakhar Shala (School for children of cane harvesting labors) | 35710 | 28706 | 230512 | -- | 120236 | 60335 | 16911 | **492410** |
| 6 | Health camp & Awareness (Annual Function) | 302788 | 147970 | 307288 | 362548 | 336005 | 567236 | 69456 | **2093291** |
| 7 | Holy programs | 197482 | 114286 | -- | -- | -- | -- | -- | **311768** |
| 8 | Other Social Activities | 839308 | 4114230 | 751740 | 656750 | 575362 | 365498 | 264609 | **7567497** |
| 9 | Tree Plantation | 140773 | 438926 | 76684 | 335210 | 689195 | 720000 | 327500 | **2728288** |
| 10 | Bus Stop/Road Development, School bus Etc.) | 768881 | 280855 | 429459 | 546213 | 750923 | 435150 | 4215410 | **7426891** |
| 11 | Shree Janseva Pratishthan | 839308 | 4114230 | 3605487 | 2350000 | 275326 | 275000 | 130000 | **11589351** |
| 12 | Covid - 19 Social Activities | -- | -- | -- | -- | -- | -- | 528615 | **528615** |
| | **Total Amount Rs.** | **3744996** | **10144629** | **6072697** | **5344360** | **5440569** | **3536731** | **6733808** | **41017790** |

For Shreenath Mhaskoba Sakhar Karkhana Ltd.,

D.M.Raskar
Chief Executive Office


**Head Off.** "Maghdoot Building" 2nd Floor,S.No.12/2,Behind Bharat Petrol Pump, Old Lokhandi Pull Lane, Opp.Akashwani Centre, Hadapsar, Pune - 411 028. EPABX : 8551868899 Super Fax No. 011-43850261 **Regd. No.** : U 15424 PNA 1999 PLC 13976
**Email :** smskl@rediffmail.com, smsklho@rediffmail.com **Website :**www.shreenathsugar.com

# श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना लि.

## सामाजीक कार्यातील सहभाग

### १) श्री जनसेवा प्रतिष्ठाणची स्थापना :-

कारखान्यामार्फत शिक्रापुर येथे श्री जनसेवा प्रतिष्ठाण ही सेवाभावी संस्था चालवली जात आहे. त्यामधे **स्व. संभाजी करपे आयुर्वेदिक चिकित्सालय**, महिला सबलीकरणाच्या दृष्टीकोणातुन **स्व. कलावती राऊत महिला प्रशिक्षण केंद्र** तसेच **आर्थिकदृष्टया मागासवर्गीय, अनाथ व ऊसतोडणी मजुरांच्या मुलांकरीता वसतीगृह** सन २०११ पासुन श्री. राऊत व त्यांचे सहकारी यांनी स्व **संभाजीराव भुजबळ नावाने वसतीगृह** चालवत आहेत.




**२) शाळांना आर्थिक मदतः-** कारखाना कार्यक्षेत्रातील जिल्हा परिषद शाळांचा शैक्षणीक दर्जा सुधारणे करीता आर्थिक मदत केली जाते तसेच धार्मीक संस्था यांना आर्थिक मदत केली जाते.



सोबतच्या फोटोमधे जिल्हा परिषद प्राथ. शाळा. पाटेठाण यांना मिळालेले ISO सर्टिफिकेट प्रदान करताना कारखान्याचे अध्यक्ष श्री. पांडुरंग राऊत व संचालक श्री. अनिल भुजबळ.

**३) वृक्ष लागवड** :- कारखाना शासनाच्या धोरणानुसार पर्यावरण समतोल राखणे करीता कारखाना कार्यक्षेत्रात वृक्ष लागवड केली जाते. या वर्षी शासनाच्या एकच लक्ष दोन कोटी वृक्ष या योजनेत सहभाग घेत दौंड तालुक्याचे तहसीलदार साहेब यांचे उपस्थितीत दोन हजार वृक्ष लावले गेले आहेत.



On 1st July 2016 'Van Mahostav' In photo – Hon. Shri. Pandurang Raut (Chairman), Hon. Shri. Babanrao Gaikwad (Vice Chairman), Hon. Shri Uttam Dighe (Tahasildar, Daund)

**This Year Tree Plantation Details**

| | Season 2015-16 Plantation No. of plant | Season 2016-17 plantation | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Karkhana site plantation | Farmer/school free distribution | Total | To date |
| 1 | 9597 | 2649 | 1037 | 3686 | 13283 |

| अ.क्र. | कारखान्या मार्फत लावलेली झाडे | शेतकऱ्यांना मोफत दिलेली झाडे | एकुण सख्या |
|---|---|---|---|
| १ | १२,२९६ | ११,७७० | **२४,०६६** |

**४) देशी गाई पालन, गो-दान व दुष्काळग्रस्त भागात जनावरांकरीता चारा पुरवठा** :- हिंदु धर्मामधे गाईस पवित्र माणले जाते या धर्तीवर कामी होत चाललेली देशी गायींची संख्या विचारात घेऊन कारखान्याने साईटवर देशी गायी गो-पालन प्रकल्प कार्यरत आहे. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार विना मोबदला गो-दान दिले जाते. तसेच दुष्काळग्रस्त भागात जनावरांना चाऱ्याचाही पुरवठा कारखान्या मार्फत केला जातो.




**५) पतसंस्थेची स्थापना** :- सन २००७ रोजी कारखाना व शेतकरी यांना आर्थिक व्यवहार करणे सोयीचे व्हावे म्हणुन श्री. राऊत यांनी मित्रपरिवार व सर्व सहकाऱ्यांना बरोबर घेऊन आवश्यक त्या भाग भांडवलाची उभारणी करून श्रीनाथ म्हस्कोबा क्रेडीट को. ऑप. सोसायटी लि, या संस्थेची स्थापना केली. सध्या कारखाना साईट, शिक्रापुर, तळेगांव, उरूळी कांचन व पेरने येथे एकुण पाच पतसंस्थेच्या शाखा कार्यरत आहेत.

**६) स्नेह मेळावा उपक्रमांचे आयोजन** :- कारखाना शेतकरी बांधव व कर्मचारी यांचेकरीता प्रतिवर्षी वार्षिक स्नेह मेळाव्याचे आयोजन केले जाते त्या निमित्ताने मोफत आरोग्य शिबीर व परिसरातील गुणवंत व्यक्तींच्या काला गुणांना वाव देणे करीता विविध पुरस्काराचेही आयोजन कले जाते.





**७) होतकरू लघु उद्योजकांना मार्गदर्शन व मदत** :- कारखान्या मार्फत होतकरू लघु उद्योजकांना तांत्रिक व व्यवस्थापन सल्ला व मार्गदर्शन करण्यात येते तसेच काही आर्थिक मदत हवी असल्यास विविध संस्थांच्या माध्यमातुन मदत मिळवून देणेस मदतही केली जाते.

**८) साखर शाळा** :- हंगाम कालावधीत ऊसतोडणी मजुरांबरोबर आलेल्या शाळकरी मुले शाळेपासुन वंचीत राहु नयेत या करीता कारखान्यावर साखर शाळे करीता व अंगण वाडी करीता स्वतंत्र व्यवस्था असुण नियमित शाळा चालवली जाते तसेच जिल्हा परिषद व कारखान्या मार्फत मोफत पोषण आहारही दिला जातो.





**९) शेतकऱ्यांना अर्थिक मदत** :- कारखान्याच्या मार्फत ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मुलांच्या उच्च शिक्षण, लग्ण व दवाखान्या करीता सढळ हाताणे मदत केली जाते.

**१०) कंपोस्ट खत प्रकल्प** :- शेण खताची दिवसेंदिवस वाढत जाणारी किंमत विचारात घेता शेणखतास पर्याय म्हणून कारखान्यावर कंपोस्ट खताचा प्रकल्प उभा केलेला आहे. कारखान्या मार्फत गुणवत्तापुर्ण कंपोस्ट खत शेतकऱ्यांना माफक दरात दिले जाते व त्याची रक्कम पुढील येणाऱ्या ऊसामधुन घेतली जाते.

## ११) ऊस विकास कार्यक्रमः-

१) कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारी रासायनिक व जैविक खते तसेच कृषी औषधे उपलब्ध करून देण्यासाठी तसेच त्यांना मार्गदर्शन करणेसाठी मान्यताप्राप्त श्रीनाथ म्हस्कोबा ॲग्री सर्विसेसची स्थापना.

२) ऊस उत्पादन वाढीसाठी महाराष्ट्र शासन कृषी विभागा अंतर्गत शेतकऱ्यांसाठी एकात्मीक ऊस विकाास कार्यशाळा चालविली जाते. त्यामध्ये खत / पाणी व्यवस्थापन व ठिंबक सिंचनवर जास्तीत जास्त मार्गदर्शन करून शेतकऱ्यांना प्रोत्साहित करण्यात येते.

३) शेती क्षेत्रामध्ये विदेशी तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर व्हावा याचे मार्गदर्शन घेणेसाठी इस्त्राईल, युरोप व चिन इ. देशांना शेतकऱ्यांसमवेत वेळोवेळी भेटी.

४) शेतकऱ्यांना दर्जेदार ऊस बियाने उपलब्ध करून देणेसाठी कारखाना साईटवरून रोपवाटीका सुरू तसेच नामांकित कंपन्यांकडुन उपलब्ध करून देण्याची व्यवस्था.

५) कारखान्यात स्वतंत्र ऊस विकास विभागाची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामार्फत शेतकऱ्यांना ऊस पिकाचे नियोजनाबाबत मार्गदर्शन केले जाते.

६) कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या शेतातील मातीचे परिक्षण कारखान्यामार्फत मोफत करून देणेत येते व त्यानुसार शास्त्रीय मार्गदर्शन केले जाते. त्यामुळे ऊस उत्पादकतेत वाढ होऊन शेतकऱ्यांचे एकरी उत्पन्न वाढले आहे.





## १२) रस्ते दुरूस्ती :-

ऊस वाहतुकीच्या निमित्ताने परिसरातील सर्व गावातील रस्त्यांची दुरूस्ती कारखान्याने जे.सी.बी, ट्रॅक्टर्स, इ. यंत्र सामुग्री वापरून केलेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दळणवळणास सोयीचे होत आहे.

## १३) शैक्षणीक सुविधा :-

१) तळेगांव ढमढेरे येथे कारखान्याचे अध्यक्ष मा. श्री. राऊत साहेब व त्यांचे सहकारी यांनी **जयवंत एज्युकेशन सोसायटीचे** शिक्षण संकुल सुरू केले आहे. तेथे पुर्व पुर्वप्राथमिक, प्राथमिक, पदविका, पदवी, पदवीत्तर शिक्षणाची सर्व शाखांमध्ये सोय करण्याात येणार आहे.

२) **स्कुलबस** :- कारखाना साईटवर वास्तव्यास असलेल्या कामगांरांच्या मुलांना शाळेत जानेकरीता स्वतंत्र स्कुलबसची व्यवस्था केलेली आहे.

३) तसेच भविष्यात कारखान्यावर शैक्षणिक संकुल ऊभारणीची प्रक्रिया सुरू आहे.

- केंद्र व राज्य शासनाने राबविलेल्या विविध योजनांत सहभागः-

### १. महाराष्ट्र राज्य शासनाच्या जलयुक्त शिवार योजनेत सहभाग :-

कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री. पांडुरंग आबाजी राऊत यांच्या पुढाकाराने महाराष्ट्र राज्य शासनाच्या **"जलयुक्त शिवार"** या घोषणेनुसार कारखान्याने स्वखर्चाने सुमारे २.५० कोटी लिटर्स् क्षमतेचा तलाव तयार केला आहे. खालील छायाचित्रात तलावातील जलसाठा दिसत आहे. तसेच कारखाना कार्यक्षेत्रातही जल संधारणाची कामे केलेली आहेत.






२. **सफाई अभियान** :- शासनाच्या स्वच्छ भारत अभियाना अंगर्तत कारखान्यावर वर्षातुन दोन वेळेस सामुदयीक स्वच्छता अभियान राबवले जाते.




३. **<u>प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना</u>** :-

ऊस उत्पादक शेतकरी तसेच कारखान्यातील कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय यांचेकरीता केंद्र शासनाने राबविलेल्या प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजने अंतर्गत वय १८ ते ५० वर्षे वयोगटातील प्रत्येक व्यक्तींसाठी रू.२.०० लाखांचा आयुर्विमा रू.३३०/- प्रतीवर्षी या योजनेत प्रोत्साहित करीत आहेत.

४. **<u>प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना</u>**:-

केंद्र शासनाने प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेअंतर्गत कारखान्याने ज्यांचे वय १८ ते ७० वर्षे आहे. अशा सर्व बचत बॅंक खातेधारकांसाठी अपघातामुळे झालेला मृत्यू आणि कायमस्वरूप अपंगत्व आलेल्या आलेल्यांसाठी फायदेशीर होणार आहे. याचा वार्षीक प्रिमियम फक्त रू.१२ असुन २ लाखाचा अपघाती विमा आहे.

५. **<u>अटल पेन्शन योजना</u>**:- (वय वर्षे १८ ते ४० वर्षे पर्यंत)

केंद्र शासनने वय वर्षे ६० नंतर रू.१,०००/- ते ५,०००/- पर्यंत मासिक पेन्शन मिळणेकरीता अटल पेन्शन योजना चालु केलेली आहे.

६. **<u>प्रधानमंत्री मुद्रा योजना</u>**:-

केंद्र शासनाने प्रधानमंत्री मुद्रा योजने अंतर्गत शिशु लोन (रू.५०,०००/- पर्यंत कर्ज), किशोर लोन (रू.५०,०००/- ते रू. ५ लाखापर्यंत कर्ज), तरूण लोण (रू.५ लाख ते रू. १० लाखांपर्यंटा कर्ज) या योजनेमधे सहभाग घेऊन त्याचा फायदा कारखान्याच्या संबंधीत शेतकरी बांधव तसेच कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय यांना करणेचे नियोजन आहे.

## ७. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना:-

प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेअंतर्गत १) कस्टमर सर्व्हिस एक्झीक्युटीव्ह (Meet & Greet) २) फुड ॲण्ड बेव्हरेज सर्व्हिसेस (Steward) ३) हाऊसकिपींग (Room Attendant) ४) हाऊसकिपींघ (Manual Cleaning) या अभ्यासक्रमांसाठी महाराष्ट्र राज्य इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरींग टेक्नॉलॉजी या संस्थेत पाठविणेबाबत कारखाना परिसरातील सुशिक्षीत बेरोजगारांना प्रोत्साहन देण्यात येत आहे.

## ८. स्वच्छ भारत अभियान :-

शासनाच्या या योजने अंतर्गत ऊस तोडणी मजुरांकरीता कारखाना साईटवर मोफत शौचालयाची सोय केलेली आहे.

